आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

The New Miraj Education Society's

# Kanya Mahavidyalaya, Miraj

One Day National Multidisciplinary National Seminar

On

# Emerging Trends and Issues in Social Sciences

Saturday, 1st February, 2020

## *Organized by*

Department of Economics, Geography, History, Political Sciene, Psychology, Sociology and Physical Education & Sports

Editor

Prof. Babasaheb Sargar

Co-editor

Prof. Ramesh Kattimani

Volume II



Affi. No. 452 Titave 2

| | | | |
|---|---|---|---|
| 43 | प्रा.बोरकर एस.जे | नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | 163 |
| 44 | सौ. अनुराधा प्रशांत पवार (गोरे) | सत्याचा आग्रह धरणारा महात्मा | 166 |
| 45 | पूर्वा हरी गोडसे<br>रोहिणी शिवाजी साळुंखे | सकाळ माध्यम समूहाची वाटचाल | 170 |
| 46 | श्रीमती लीना भिमराव पाटील | खेळ आणि बालकाचा विकास | 174 |
| 47 | हेमंत केशवराव बारसागडे | शारीरीक तंदुरुस्ती व मुलांचा विकास | 177 |
| 48 | प्रा.ज्योती तानाजी गावडे | शारीरिक तंदुरूस्ती आणि मानसिक आरोग्य | 181 |
| 49 | सुनिल बापुराव धोंडगे | अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरीय कयाकिंग व कनोईंग खेळाडूंचा फुफ्फुसिय उच्छवसन क्षमतांचा तुलनात्मक अभ्यास | 184 |
| 50 | प्रा. विजयकुमार उत्तम घाडगे | आधुनिक जीवन शैलीत खेळाडूची शारीरिक क्षमता व मानसिक स्थीती अभ्यासणे | 186 |
| 51 | डॉ. मुल्ला इब्राहिम हमजा | कोल्हापूर (महाराष्ट्र) शहर मे बसे स्कूलोंसे पूर्व प्राथमिक स्तर मे पढनेवाले बच्चों के प्राथमिक गतीविधियों का निरीक्षणात्मक अभ्यास | 188 |
| 52 | प्रा. डॉ. अभिजित वणिरे | व्यायामाचा दहा ते बारा वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीवर होणारा परिणाम – एक अभ्यास | 192 |
| 53 | प्रा.गोनुगडे शंकर लक्ष्मण | आंतरमहाविदयालयीन स्तरावरील वेटलिफ्टर व शरीरसौष्ठव स्पर्धेत भाग घेणाऱ्या पुरुष खेळाडूंच्या स्व–संकल्पना स्तराचा अभ्यास | 196 |
| 54 | प्रा.लवंगारे गणेश मारूती | आरोग्यदायी चालणे | 200 |
| 55 | डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके | २१ व्या शतकातील स्त्रीवादी चळवळीचे राजकीय स्वरूप | 204 |
| 56 | प्रा.बळवंतराव क.जाधव | बालगुन्हेगारी : एक चिकित्सक अभ्यास | 206 |
| 57 | कु. विद्या चौरपगार (डार्लीबकर) | महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळ : एक अध्ययन | 211 |
| 58 | डॉ. कल्पना वैद्य | भारतीय संघात्मक शासन व्यवस्था में उभरती हुई नवीन प्रवृत्तियाँ | 214 |
| 59 | डॉ. भीमाशंकर म. डहाळके<br>श्री. अतुल सुभाष टिके | राज्यपालांची बदलती राजकीय भूमिका | 219 |
| 60 | प्रविण अरुण पोवार | सद्यकालीन राजकीय परिस्थितीत राज्यपालांची भूमिका | 221 |
| 61 | प्रा. डॉ. मोहन दे. वानखडे | स्त्री–पुरुष समानता आणि वर्तमान स्थिती | 225 |
| 62 | श्री.जिजाभाऊ सिताराम धुले<br>डॉ. संजय बापुराव गायकवाड | समकालीन राजकीय परिस्थितीत राज्यपालांची भूमिका | 228 |
| 63 | प्रा. ओंकार नरेंद्र केने | पुणतांबा येथील शेतकऱ्यांचा संप आणि शेतकऱ्यांचे संघटन | 233 |
| 64 | गजानन विठ्ठल बोधले<br>ज्योती रमेश कांबळे | नागरिकत्व कायदा वास्तव आणि सत्यता | 237 |






Affi No. 452


3

45

# सकाळ माध्यम समूहाची वाटचाल

**पूर्वा हरी गोडसे** **रोहिणी शिवाजी साळुंखे**
विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ.

**प्रस्तावना:**

संवाद ही माणसाची सगळ्यात मोठी गरज आहे. आदिम काळापासून मानव निरनिराळ्या मार्गाने संवाद करत आहे. 'जनसंवाद' हा संवादामध्ये एक मैलाचा दगड म्हणून ओळखला जातो. त्यामध्ये मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि वेब माध्यमे इत्यादी प्रकार पडतात.

मुद्रित माध्यमे ही विश्वाससार्ह असतात. किंबहुना इतर माध्यमांच्या तुलनेत मुद्रित माध्यमांवरील लोकांचा विश्वास गाढा आहे. जेव्हा तंत्रज्ञान नुकतेच बाळसे धरू लागले होते तेव्हापासून मुद्रीत माध्यमांचे गारुड जनमनावर आहे.

वर्तमानपत्र हे सगळ्यात महत्त्वाचे मुद्रित माध्यम म्हणून ओळखले जाते. जागतिक घडामोडी तसेच सभोवतालच्या वातावरणाचे भान वर्तमानपत्राने माणसाला येते.

आपल्याकडे स्थानिक ते देशपातळीवर प्रकाशित होणारी असंख्य दैनिके आहेत. महाराष्ट्रात ही दैनिकांची संख्या खुप मोठी आहे. त्यापैकी जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारी काही मोजकी दैनिके आहेत. त्यापैकीच एक सकाळ या माध्यमसमूहाची वाटचाल जाणून घेण्याचा हेतूने हा विषय निवडण्यात आला.

**उद्दिष्टे:**

1) सकाळ या वर्तमानपत्राचा अभ्यास करणे.

2) सकाळ या वर्तमानपत्राची मुद्रित ते वेब माध्यमांपर्यंत स्थित्यंतरे अभ्यासणे.

**विषयाचे महत्व:**

सकाळ हे वृत्तपत्र अनेक माध्यमातून प्रवास करत आहे. सकाळचा इतिहास, त्याच्या आवृत्या, विविध पुरवण्या, वाहिन्या, इ–सकाळ पोर्टल अश्या अनेक कंगोऱ्यामधून सकाळ वृत्तपत्राचा प्रवास सुरु आहे. या संशोधनातुन सकाळ या वृत्तपत्राची वाटचाल अभ्यासाला मिळाली.

**दैनिक सकाळचा इतिहास:**

नानासाहेब परुळेकर यांनी ०१ जानेवारी १९३२ रोजी नवे युग सुरु करणारे दैनिक म्हणून जनसामान्यामध्ये ठसा उमटवला. सकाळ वृत्तपत्र सुरु करताना नानासाहेबांनी जनताभिमुख धोरण ठरविले होते. वृत्तपत्राची अशी पण जूनी होती ती चौकट सकाळने मोडली. बातमी ही प्रत्यक्षात जागेवर जाऊन मिळवलेली व ताजी बातमी वाचकांपर्यंत कशी पोहचेल याची काळजी सकाळने घेतली.

सकाळ समूह हा डॉ. ना. भी. परुळेकरांशिवाय समजावणे केवळ अशक्य आहे. सकाळचे संस्थापक संपादक डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी अमेरिकेत राहून पाच वर्षे वृत्तपत्र विद्या संपादन केली. शिक्षण घेत असताना तेथे स्थानिक वृत्तपत्रामध्ये सूक्ष्म निरीक्षण केले व तेथेच त्यांनी मनाशी काही आखाडे पक्के केले. वृत्तपत्र हे मतपत्र असता कामा नये रोजच्या जीवनाशी त्याचा संबंध असावा. समाजातील प्रत्येक स्तरांतील लोकांना त्याचे आकर्षण वाटले पाहिजे. असा निश्चय करुन नानासाहेब १९२१ साली हिंदुस्थानात परतले.[१]

हिंदुस्थानात परत आल्यावर नानासाहेब समकालीन वृत्तपत्रांचा अभ्यास करु लागले. त्या काळात त्यांना टिळक व केळकर यांचे मार्गदर्शन लाभले. या मार्गदर्शनाच्या जोरावर त्यांनी वृत्तपत्र सुरु करण्याचा निश्चय केला. साधी, सोपी, सुबोधप्रचारातली भाषा, ताज्या चौफेर बातम्या आणि सर्वसामान्य जनतेच्या दु:खाना वाचा फोडण्याचा मुलमंत्र घेऊन नाना साहेबांनी ०१जानेवारी १९३२ रोजी पुण्यातून चार पानी सकाळ वृत्तपत्र सुरु केले.



Affi No. 452 4 Titave

नाना साहेबांनी जे वृत्तपत्र सुरु केले त्यामध्ये जास्तीत जास्त ताज्या बातम्या आणि सामान्य माणसालाही वाचावेसा वाटेल असा मजकूर होता. नानासाहेब चालक,मालक,व्यवस्थापक व संपादक होते पण त्यापेक्षाही अधिक वृत्तसंपादक होते. ते नेहमी बातमीबद्दल जास्त जागरुकता दाखवित असत. त्यांनी सकाळच्या पहिल्याच अग्रलेखात असा उल्लेख केला आहे की, हिंदूस्थानातच काय पण जगाच्या बाजारपेठेत आज जे जे चांगले पदार्थ मिळतात ते सर्व महाराष्ट्राच्या वाचकांच्या ताटात जावून वाढण्याचा संकल्प आहे. ज्ञानाची विशेष भूक लागते म्हणून इंग्रजी पत्र वाचणाऱ्याला मराठी वाचकाला अखेर आपण खानावळीत जेवत आहोत ही जाणिव झाल्याशिवाय राहणार नाही. त्याऐवजी महाराष्ट्राच्या अनुभवाने, ज्ञानाने व संपादित बुध्दी मार्गाने बनवलेला पाक मराठी वाचकांना या पत्राद्वारे मिळाला अशी आमची मनीषा आहे. नानासाहेबांना फक्त महाराष्ट्रातल्या बातम्या द्यायच्या नव्हत्या तर संपूर्ण जगातल्या बातम्या द्यायच्या होत्या.[२]

वृत्तपत्राला एक नवे वळण लावणारे नानासाहेब परुळेकर हे एक यशस्वी संपादक होते. व्यावसायिक पत्रव्यवसायात ठसठसीत स्थान मिळवून देणारे ते एक क्रांतीकारक पत्रकार होते. अत्यंत योजनापूर्वक आपल्या वृत्तपत्राची आणखी आणि वाढ केली. त्यांच्या दृष्टीकोनातून कृतीत काही विसंगती आढळल्या तरी ते थोर संपादक म्हणून त्याची आठवण कायम राहणारे आहे. ते एक संपादक होतेच पण त्यासमवेत ते एक कुशल शेतकरीसुद्धा होते. वृत्तपत्र सुरु असतानाही त्यांनी शेती करणे बंद केले नव्हते.

१९३२ साली सकाळ चार पानी निघत होते. त्या काळी वृत्तपत्र सुरु करायचे म्हणजे सोपे काम नव्हते. पण जिद्दीने पेटून उठलेल्या नानासाहेबांनी चिकाटी सोडली नाही. वृत्तपत्रासाठी लागणारी रक्कम त्यांनी कर्जाने घेतली.

वृत्तपत्र सुरु झाल्यानंतर सुरुवातीला छापखान्याचे काम शं. रा. उर्फ मामा दाते पाहत होते. संपादकीय विभागात शि. ल. करंदीकर, श्री. आपटे, श्री. वि. गाडगीळ, ना. तू. ठाकूर आणि गो. कु. रानडे व शंकर पारणकर यांनी वार्ताहर म्हणून काम पाहिले. रा. क. लेले यांनी ''मराठी वृत्तपत्राचा इतिहास'' या पुस्तकामध्ये म्हटले आहे की, "सकाळ पत्र कोणताही एखादा विशिष्ट मतप्रवाह घेऊन किंवा कोणत्या एखादया पक्षाचा पुरस्कार करण्याचा हेतू पुढे घेऊन निघाले नव्हते." पहिल्या अंकातील अखिल महाराष्ट्राचा प्रयत्न या मथळ्याच्या निवेदनात म्हटले होते की, रोजची बातमी गोळा करुन स्वदेश व परदेश यात एक वेळी काय चालले आहे यांची कल्पना मराठी वाचकास जितक्या पूर्वतेने देता येईल तितकी देऊन विचार करण्यास लागणारी सामुग्री जनतेला पुरवावी ही आमची योजना आहे. विद्यमान पक्ष, उपपक्ष, पंथ, परंपरा यातील उखाळ्या मागील अंकावरुन पुढे चालू करण्याऐवजी त्यांचा शक्य तितक्या लवकर इतिश्री व्हावी व विचारवंताचा असा एक पक्ष महाराष्ट्रात बलिष्ठ, संघटित व कार्यान्मुख व्हावा असे पत्राचे धोरण राहिल. परस्परांचे मतभेद असले तरी मतद्वेश नसावा व सर्व विचारांचे ओघ अखेर नद्याप्रमाणे समाजहिताच्या समुहात विलिन व्हावेत असा आमचा प्रयत्न आहे.[३]

वरील विचारावरुन हे समजते की सकाळ हे दैनिक फक्त समान हिताने प्रेरित झालेले दैनिक होते. वाचकांचा विचार करणारे हे दैनिक वाचकांना काय पाहिजे, वाचकांना काय आवडते. यांचा विचार करुनच थोडक्यात निव्वळ वाचकांसाठी वाहिलेले हे दैनिक आहे.

सकाळ हे वृत्तपत्र सुरु होण्यापूर्वी पुण्यामध्ये दै. ज्ञानप्रकाश, दै. केसरी ही दोन वृत्तपत्र होती. या दोन्हींही वृत्तपत्रांचा प्रभाव पुण्यातील जनतेवर चांगलाच होता. मग ह्या अवस्थेत सकाळ चालेल का असा प्रश्न नानासाहेबांच्या मनात होता पण त्यांनी सकाळ सुरु करण्यापूर्वीच दै. ज्ञानप्रकाशमधील दोन महिन्याची कात्रणे काढली. त्यावेळी नानसाहेबांच्या लक्षात आले की, ज्ञानप्रकाशमध्ये ताज्या बातम्या अर्धुया किंवा पाऊण कॉलमपेक्षा जास्त नाहीत. यांचा विचार करून केसरीमध्ये अर्धा कॉलम मजकूर प्रसिध्द् केला. त्यामध्ये वृत्तपत्राला नाव सुचवण्याची स्पर्धा जाहीर केली. व स्वतः मनाशी ठरवले की ही वृत्तपत्रे अर्धा कॉलम देतात तर आपण तीन–चार कॉलम का देवू शकणार नाही.



Affi No. 452 Tilave

5

सकाळने नेहमीच इतर वृत्तपत्रांपेक्षा वेगळी भूमिका घेतली होती. स्थानिक बातम्या मिळवण्यासाठी प्रत्येक गावात सकाळने वार्ताहर नेमले होते त्यांच्याकडून तारेने किंवा फोनवरून बातमी उपलब्ध केली जात असे. पुढे सकाळने मुंबईच्या बातम्या मिळवण्यास सुरूवात केली. मुंबईमध्ये खास प्रतिनिधी गोविंद मंगेष लाड हे होते.

सकाळने पहिल्या वर्षी केलेल्या कामगिरी विषयी ०३ जानेवारी १९३३ च्या अंकामध्ये केसरीने एक स्फूट लेखात म्हटले आहे की, अंक नियमित काढणे, वाचकांना ताजी बातमी पुरवणे, परदेशी, मनोरंजक माहिती देणे ही नवी प्रथा सुरू करून पत्रास आकर्षकपणा आणला आहे. मुंबईपेक्षा पाश्चात्य दैनिकांना अडचणी येतात, ताजी बातमी पुरविण्यास अडचण पडते, अशी जूनी समजूत होती.सकाळने ती खोटी ठरवून कित्येक वेळा मुंबईच्या पत्रांवर मात केली आहे. २३ जून १९३४ रोजी सकाळचे पाहिले रोटरी मशीन सुरू करण्याचा छोटा समारंभ झाला. त्यावेळी लोकनायक माधव श्रीहरी यांनी गौरव करताना म्हटले होते की, ''समाजातील सर्व वर्गात वृत्तपत्र वाचनाची आवड उत्पन्न करून लोकशाहीची कल्पना देण्याचे कार्य सकाळ करीत आहे.''

वृत्तपत्राची आर्थिक बाजू सांभाळण्याचा नाही, तर समाज प्रबोधन याक्षेत्रात सकाळची महत्वपूर्ण भूमिका आहे. छोट्या जाहीराती लोक ताज्या बातम्याप्रमाणे वाचतात ही घोषणा सकाळने लोकप्रिय केली. दै. सकाळ सुरू केल्यावर वर्षभरातच साप्ताहिक सुरू केले व दै. सकाळ चे असे त्याचे स्वरूप न ठेवता स्वतंत्र साप्ताहिक पत्र अशा पध्दतीने ते उभे केले होते. ०१ जानेवारी १९३३ रोजी साप्ताहिक सकाळचा पहिला अंक प्रकाशित झाला. त्यानंतर तेज नावाचे एक निराळे कमी किमतीचे म्हणजेच केवळ एक पैसा (जुना) किमतीचे दैनिक नानासाहेबांनी सुरू केले.[४]

पुण्यामध्ये दैनिक सकाळ, साप्ताहिक सकाळ, दैनिक तेज ही तीन वृत्तपत्रे सुरळीत सुरू झाल्यानंतर नानासाहेबांना मुंबईमध्ये एक वृत्तपत्र असावे असे वाटू लागले. विचार पक्का झाल्यानंतर एक फ्लॅट बेड रोटरी मशीन खरेदी करून मुंबईत एक सुसज्ज असा छापखाना उभारण्यात आलाआणि 'स्वराज्य' नावाचे दैनिक २१ मार्च १९३६ रोजी सुरू करण्यात आले. पण काही काळातच नानासाहेबांनी १२ डिसेंबर १९७०पासून मुंबई सकाळ हे मराठी दैनिक सुरू केले. पहिल्यांदा वा. दा. थत्ये हे पत्राचे स्थानिक संपादक होते.[५]

सकाळ पत्राने लोकहित हे सर्वात महत्त्वाचे मानून अनेक सार्वजनिक प्रकरण हाती घेऊन तड लागेपर्यंत त्याचा त्यांनी पिच्छा पूरवला. १९३६ साली पुणे नगरपालिकेने सायकलमागे दोन रूपये कर बसविला सकाळने त्याविरूध्द आघाडी उघडून तो कर रद्द करण्यास भाग पाडले. पुणे पालिकेतील कारभार पक्षातील असावा म्हणून सकाळने नागरी संघटना स्थापन करून, तिच्यामार्फत १९३२ साली प्रथम निवडणुका लढवल्या. नागरी संघटनेला यश मिळाल्यानंतर गरिबांसाठी अर्ध्या फीमध्ये पालिकेतर्फे माध्यमिक शाळा सुरू केल्या.

समाजहितासाठी मदत करणे हा हेतूसकाळने पहिल्यापासून ठेवला होता. अनेक नैसर्गिक आपत्कालीन निधी उभारून मदत कार्ये केले. १२ जुलै १९६१ रोजी पानशेत धरण फुटुन पुणे शहरावर पुराची आपत्ती कोसळली. त्यावेळी सकाळ कचेरीत पाणी जावून छपाईची यंत्रे बारा फुट पाण्याखाली गेली. यात यंत्राचे मोठे नुकसान झाले. मात्र त्याही काळात सकाळने पूरग्रस्तांसाठी मदत केली. सकाळची मालकी २१ सप्टेंबर १९८७मध्ये उद्योजक प्रतापराव पवारांनी घेतली.

**दैनिक सकाळची इतर प्रकाशने**

दैनिक सकाळने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. वाचकांसाठी ज्ञानाचा, मनोरंजनाचा खजिना खुला केला.

**सकाळची इतर प्रकाशने:**

१) सप्तरंग: ०७ जानेवारी १९९६

२) मधुरा: ०५ जानेवारी २००२

३) बालमित्र: ०१ मार्च २००२

४) फॅमिली डॉक्टर: २३ आक्टोंबर २००३

या साप्ताहिक पुस्तिका दैनिकाबरोबर प्रकाशित केल्या.




Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya Titave
Affi No. 452
6

५) मधुरा व तनिष्का ही प्रकाशने महिलांसाठी प्रकाशित केली.
६) सकाळ माध्यम समूहाने कृषीविषयक 'अॅग्रोवन' हे १६ पानी टॅब्लेट आकाराचे सहा आवृत्यामध्ये २० एप्रिल २००५ पासून सुरू केले.
७) ई. सकाळ ही इंटरनेट आवृत्ती २६ जानेवारी २००० पासून सुरू झाली. पहिल्याच दिवशी ५००० लोकांनी ही आवृत्ती वाचली.
८) ५४३२१ ही एस.एम. एस. वर आधारित मोबाईल सेवा सूरू केली.
९) १३ ऑगस्ट २००८ रोजी सकाळ माध्यम समूहाने 'साम मराठी' इलेक्ट्रानिक वाहिनी सुरू केली.
१०) पूर्ण वेळ राजकिय घडामोडीसाठी वाहिलेले मराठी भाशेतील पहिले राजकीय वेब पोर्टल सकाळ माध्यम समूहाने 'सरकारनामा' हे सुरू केले. ०१ मे २०१७ रोजी अभिजित पवारांच्या संकल्पनेतून हे वेब पोर्टल सुरू केले.

याचबरोबर सकाळ टाईम्स व गोव्यातून गोमंतक टाईम्स हे इंग्रजीमधून प्रसिध्द् होतात. भारताचे परराष्ट्र धोरण, संवेदनशील घडामोडी, अर्थशास्त्र,व्यवसाय, पर्यावरण, ऊर्जा, तंत्रज्ञान व संस्कृती, शिक्षण व सार्वजनिक आरोग्य याबद्दल माहिती प्रसिध्द केली जाते.

**दैनिक सकाळच्या पूरवण्या :**

सोमवार : जागर, मंगळवार : जॉब, बुधवार : एज्युमंत्रा, गुरूवार : स्मार्ट सोबती, शुक्रवार : फॅमिली डॉक्टर, शनिवार : बालमित्र, रविवार : सप्तरंग.

**सकाळची नियतकालिके :**

साप्ताहिक सकाळ, तनिष्का (मासिक), प्रिमियर, यंग बझ ही नियतकालिके प्रसिद्ध होतात.

**सकाळच्या विविष आवृत्या:**

पुवरण्यासोबतच सकाळने महाराष्ट्रात विविध आवृत्या सुरू केल्या यामध्ये पुणे, औरंगाबाद, रत्नागिरी, जळगाव, मुंबई, धुळे, सातारा, नांदेड,कोल्हापूर, नागरपूर, सोलापूर, रायगड, नाशिक, नंदूरबार, अकोला, सांगली, अहमदनगर, बेळगाव, सिंधुदुर्ग यांचा समावेष होतो.[५]

तर सद्यस्थितीला महाराष्ट्रात दैनिक सकाळचे वितरण १२,९२,१३४ इतके आहे. सकाळ सोशिल फौंडेशन, सकाळ रिलीफ फंड, तनिष्का फौंडेशन, YIN (Young Inspirators Network), पुणे बस डे, सरपंच परिषद या विविध माध्यमातून सकाळ वाचकांपर्यंत पोहचला, म्हणुन सकाळ पहिल्या क्रमांकावर वाचकांच्या पसंदीस उतरला.[६]

**निष्कर्ष :**

या संशोधनातून दैनिक सकाळ माध्यमाची वाटचाल अभ्यासाला मिळाली. तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून दैनिक सकाळ वाचकांच्या पसंदीस उतरले आहे. माहिती, ज्ञान आणि मनोरंजन या त्रिसूत्रीचा वापर करून सकाळ माध्यम समूहाची वाटचाल सुरु आहे.

**संदर्भ:**

१. लेले रा. क., (२००९),'मराठी वृत्तपत्राचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ७७६.
२. कित्ता, पृ. क्र. ७७८.
३. परुळेकर ना. भि., (१९६३),'निरोप घेता' सकाळ प्रकाशन, पुणे. पृ.क्र. १८९–१९०.
४. परुळेकर ना. भि., (१९६३),'निरोप घेता' सकाळ प्रकाशन, पुणे. पृ.क्र. १८७.
५. लेले रा. क., (२००९),'मराठी वृत्तपत्राचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ७८३.

**************



Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya Titave Affi No. 452